**नियमित फौ.खटला क्र. ३९१/२०२२**
**निशाणी क्र. १४**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**
**<u>सरतपास शपथेवर सुरु.</u>**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | पांडुरंग बाबुराव झोरे, |
| | : | वय – ६१ वर्षे, धंदा – दुध व्यवसाय |
| राहणार | : | भाउ पाटील वस्ती, पुणे |

**<u>सरतपासणी सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. आर. इंगळे यांचेमार्फत</u>**

१. माझ्या कुटुंबात माझी पत्नी कमल झोरे, दोन मुले मंगेश व रुपेश, दोन सुना रेश्मा व अमृता तसेच चार नातवंड आहेत. मी दुध व्यवसाय करतो. आमच्या घराला लागुन गोठा आहे. आरोपी आमच्या घराजवळ राहतात. त्यांचादेखील दुध व्यवसाय आहे. घटना दि. ०९/०४/२०२२ रोजी संध्याकाळी ५.३० च्या सुमारास अनिल झोरे यांच्या गोठ्याच्या समोर घडली होती. माझा मुलगा रुपेश गाई चारुन घरी घेवुन येत होता. आमच्या सहा गाई आहेत. माझा मुलगा रुपेश गाई चारुन घरी घेवुन येत असताना आरोपीच्या गोठ्याजवळ आला असता अनिल झोरे याने त्याला अडवले व बोलला की, तुमच्या गाईने आमचा ड्रम पाडला तो उचलुन का ठेवला नाही. त्यावर रुपेश असे बोलला की, रोज तुम्ही तो ड्रम रस्त्यात ठेवता बाजुला ठेवत जा, मी उचलणार नाही. त्यावेळेस मी माझ्या गोठ्याच्या बाहेर उभा होतो. रुपेश व अनिल झोरे यांची झटापटी सुरु होती. अनिल झोरे रुपेशला शिवीगाळ करत होता. त्यांचा आवाज आला म्हणुन मी तेथे गेलो. अनिल झोरे घोडा लावेल अशी काहीतरी शिवी देत होता. तो रुपेशच्या अंगावर धावुन गेला म्हणुन मी अनिल झोरे यास धरले. त्यानंतर विशाल झोरे तेथे लोखंडी रॉड घेवुन पळत आला व त्याने रुपेशच्या डोक्यात रॉड मारला .म्हणुन मी त्याला धरायला गेलो असता त्याने माझ्या देखील डोक्यात रॉड मारला. त्यानंतर माझी मोठी सुन रेश्मा आवाज ऐकुन पळत आली. तिने विशाल झोरे याच्या हातातील रॉड हिसकावुन घेतला. त्यानंतर विशाल झोरे याने तेथील लाकडी बांबू उचलला व तो माझ्यास सुनेच्या डाव्या हातावर मारला त्यामुळे बांगडी तुटुन तिच्या हातात घुसली. त्यानंतर मी अडवायला गेलो असता त्याने तो बांबू माझ्यादेखील पाठीत मारला.

थोडावेळाने ते आम्हाला मारुन निघुन गेले. त्यानंतर आम्ही खडकी पोलिस स्टेशन येथे गेलो. तेथुन पोलिसांनी आम्हाला ससुन रुग्णालयात पाठवले. त्यांनी आम्हाला चिठ्ठी दिली होती. रुपेश, मी व माझी सुन रेश्मा आम्ही रुग्णालयात गेलो तेथे आमच्यावर उपचार झाले. तेथुन यायला आम्हाला उशीर झाला. पहाटेचे ३–४ वाजले होते. म्हणुन आम्ही दुस–या दिवशी १०.०२.२०२२ रोजी तक्रार द्यायला गेलो. दिनांक १०.०४.२०२२ रोजी तक्रार दिली. मला आजरोजी ती तक्रार व छापील फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावरील सही माझी आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र.१५ व १६** देण्यात येते. त्याचदिवशी संध्याकाळी पोलिस घटनास्थळ पंचनाम्याकरीता आले होते. त्यावेळेस दोन पंच व पोलिस होते. घटनास्थळ मी दाखवले. पोलिसांनी घटनास्थळावरुन रॉड व बांबू जप्त केला. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आज आरोपी क्र. २ हजर आहे. मला मारहाण केलेला लोखंडी रॉड व लाकडी बांबू पाहिल्यास ओळखू शकतो. लोखंडी रॉड व लाकडी बांबू हे हातभर लांब असतील. मला आत्ता लोखंडी रॉड व बांबू दाखवण्यात आले. ते तेच आहेत. लोखंडी रॉड यास **आर्टीकल अ** व लाकडी बांबू यास **आर्टीकल ब** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री. एस. डी. जपे वकील यांचेमार्फत सुरु –</u>**

२. हे खरे आहे की, आम्ही राहत असलेले ठिकाण हे दाट लोकवस्तीचे आहे. हे खरे आहे की, आमची घरे पुणे विद्यापीठाच्या भिंतीला लागून खालील बाजूस आहेत. हे खरे आहे की, आम्ही राहत असलेल्या ठिकाणी आम्ही व आरोपी यांच्याव्यतिरिक्त आणखी देखील झोरे नावाचे कुटुंब राहतात. हे खरे आहे की, त्यातील बहुतेक झोरे लोकांचा व्यवसाय हा दुध व्यवसाय आहे. हे खरे आहे की, गुरे चरायला पङ्याळ वस्तीतुन बाहेर न्यावे लागतात. सदर वस्तीतील रस्ते लहान असुन त्यामध्ये गटारे, पाईप लाईन आहेत. हे खरे आहे की, आम्ही सर्वजण उतारावर राहतो व त्याच्यापुढे देखील वरच्या बाजुला वस्ती आहे. कोणत्याही गोठ्यासाठी शासकीय परवानगी लागते हे मला माहिती आहे. आमच्याकडे लायसन्स आहे. परंतु ते रिन्यु केलेले नाही. हे खरे आहे की, फिर्याद देताना आमचा गोठ्याचा परवाना दाखल केलेला नाही. हे खरे आहे की, आम्हाला सध्या परवानगी नाही म्हणुन दाखल

केला नाही. हे खरे आहे की, घटनेच्या दिवशी गोठ्यातुन गाई घेवुन जाणे येणे बेकायदेशीर होते. हे खरे आहे की, गाईंना ने आण करताना त्यांचे गोमुत्र व शेण यामुळे रस्त्यावर घाण होते. हे खरे आहे की, आरोपीचे घर आमच्या घराच्या समोर आहे पंरतु मागे पुढे आहे. हे खरे आहे की, आमच्या घराच्या पुढे सार्वजनिक शौचालय आहे. हे खरे आहे की, आमचे घर व गोठा एकच आहे. हे खरे आहे की, तेथील रस्ते लहान असल्यामुळे सर्वांचे पाण्याचे ड्रम रस्त्यावर असतात. हे खरे नाही की, झोपडपट्टी असल्यामुळे प्रत्येकाच्या घराचे नळ हे रस्त्यावर असतात. घटनास्थळाच्या आजुबाजुला चार घरे आहेत.

प्रश्न – भांडण झाले तेव्हा त्या आजुबाजुच्या घरातुन कोणीही आले नव्हते ?

उत्तर – आले होते परंतु ते लगेच निघुन गेले.

३. हे खरे आहे की, यापुर्वी आरोपीच्या घराच्या बाहेर वैरण ठेवली होती ती आमच्या गाईंनी खाल्ली होती म्हणुन तक्रार झाली होती. पड्याळ वस्तीपासुन ससुन रुग्णालयात गाडीवर जाण्यासाठी १० ते २० मिनीटे लागतात. हे खरे आहे की, पड्याळ वस्ती येथे रेंजहिल्स चौकी आहे. हे खरे आहे की, त्यादिवशी आम्ही रेंजहिल्स चौकीला गेलो नाही. हे खरे आहे की, घटनेच्या दिवशी आम्हाला लागले असल्यामुळे आम्ही थेट ससुन रुग्णालयात गेलो तेथुन प्रमाणपत्र आणले व त्यानंतर पोलिस स्टेशनला गेलो. ससुन रुग्णालयात आम्ही पाच तास होतो. तेथे डॉक्टरांना मी माहिती दिली. हे खरे आहे की, डॉक्टरांना आम्ही ६ वाजता भांडणे झाली असे सांगितले. हे खरे नाही की, फिर्यादीमध्ये ५.३० वाजता घटना घडली हे चुकीचे सांगितले आहे. हे खरे आहे की, ससुण रुग्णालयातुन घरी येताना खडकी पोलिस स्टेशन रस्त्यात लागते. हे खरे आहे की, माझ्या कपड्यांवर रक्त लागले होते. पोलिसांनी कपडे जप्त केले नाही. हे खरे आहे की, अशी काही भांडणे झाली नव्हती म्हणुन कपडे दिले नाही. हे खरे आहे की, मला आजरोजी आर्टीकल ब वरील दाखवलेला लाकडी बांबू हा हातभर लांब आहे. हे खरे नाही की, मला दाखवलेला लाकडी बांबू हा हातभर लांब नाही. फिर्याद दिल्यानंतर पोलिस पंचनाम्यासाठी आले त्यानंतर आले नाही. पोलिसांची नावे मला माहित नाही. पोलिस दि. १०.०४.२०२२ रोजी रात्री ९ ते ९.३० च्या दरम्यान आले व १० ते १०.३० च्या दरम्यान गेले. पोलिसांसोबत जे आले होते त्यांची नावे मला आठवत नाहीत. हे खरे नाही की, पोलिसांना आर्टीकल अ व ब वरील हत्यारे मी काढुन दिली. माझ्यासमोर आरोपीकडुन कोणतेही हत्यार जप्त केले नाही. पोलिसांकडे तक्रार देताना

रुपेश झोरे, मंगेश झोरे, रेश्मा झोरे माझ्यासोबत होते. पोलिसांनी त्यांचेदेखील जबाब नोंदवले. हे खरे आहे की, माझ्या फिर्यादीत आर्टीकल अ व ब वरील रॉड व बांबू हातभर लांब असल्याबाबत वर्णन नमुद नाही. फिर्याद, घटनास्थळ पंचनामा व साक्षीदारांचे जबाब नोंदवल्यानंतर आजपर्यंत पोलिस आमच्याकडे आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत आमचे पुर्वीचे वाद होते म्हणुन त्यांच्याविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नाही व कोणतेही हत्यार जप्त केले नाही.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

PRAJKTA SHIRISH APTE
Digitally signed by PRAJKTA SHIRISH APTE
Date: 2026.02.05 17:17:34 +0530

(पी. एस. आपटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र–२) खडकी, पुणे.

दिनांक – ०५/०२/२०२६